**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत व्हावा - डॉ. पांडे
## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्‌घाटन

अमरावती.

शिक्षणाचा प्रत्यक्ष उपयोग जीवनात व्हायला हवा, शिक्षणाने मनुष्याचा सर्वांगीण विकास होतो, तद्वतच तो चांगला माणूस सुद्धा होतो, त्यामुळे विद्यार्थ्यांना पाया मजबूत करणारे प्राथमिक शिक्षण मिळावे, असे प्रतिपादन निरी, नागपूरचे सायन्टिफिक ॲन्ड इन्नोव्हेटिव्ह रिसर्च ॲकॅडेमिचे माजी अध्यक्ष डॉ.जे.एस. पांडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडूल, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, समन्वयक डॉ. संदीप वाघुळे उपस्थित होते.

'इंटिग्रेटेड अप्रोच इन सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल फ्युचर' ही थीम यावर्षीच्या राष्ट्रीय विज्ञान दिवसाकरिता ठेवण्यात आली असल्याचे सांगून डॉ. पांडे पुढे म्हणाले, भारतीय शिक्षणपद्धती पाहिजे त्या क्षमतेने कार्य करतांना दिसत नसून हे क्षेत्र पदवी वाटण्याचे कारखाने झाल्यासारखे दिसतात. शिक्षण म्हणजे केवळ पदवी घेणं एवढेच नव्हे, तर शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वृद्धींगत करणे, त्यांच्यामध्ये संशोधन व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे होय. शिक्षणाने आमच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, तो सक्षम व्हावा, असे शिक्षण त्याला देण्याची गरज आहे.

देशामध्ये अनेक क्षेत्र आहेत, त्यामध्ये शिक्षण क्षेत्र असून शिक्षण हा सर्व घटकांमध्ये महत्वाचा आहे. शिक्षणावरच देशाचा विकास अवलंबून असून शिक्षणावरील बजेट वाढविण्याची गरज आहे. प्राथमिक शिक्षणापासूनच या देशात शिक्षणक्षेत्रात अमूलाग्र बदल घडून आणण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्याला योग्य प्राथमिक शिक्षण दिल्यास त्याचा पाया मजबूत होईल आणि त्याचा सर्वांगीण विकास झाल्यानंतर खऱ्याअर्थाने देशाच्या विकासासाठी हातभार लागेल. सर सी.व्ही. रमण सारख्या शास्त्रज्ञांसारखा दुसरा कोणीच तयार झाला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आज विद्यार्थ्यांना सिलॅबस देतांना मोठ्या प्रमाणावर दिल्या जातो. त्याला झेपेल एवढाच सिलॅबस अभ्यासक्रमात असला पाहिजे, म्हणजे तो योग्य रितीने आकलन करु शकेल.

निरंतर विकास महत्वाचा असून मग तो पर्यावरणाचा असेल, विज्ञान व तंत्रज्ञानाचा असेल, त्यासाठी सर्वांचा पुढाकार महत्वाचा आहे. महापुरुषांना केवळ हारतुरे वाहून चालणार नाही, तर त्यांचे विचारकार्य प्रत्यक्षपणे सर्वांनी अंगीकृत करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवावा आणि देश, समाज व विश्वाला नवी दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. आज सर्वजण शिक्षण घेऊन मोठे झाले आहे, सर्व सुविधा त्यांच्याकडे आहे, पण आपला एकमेकांवर विश्वास नाही, ही खंत असून त्यादृष्टीने शिक्षणामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. प्रत्येकाच्या जीवनात आनंद देण्याचा प्रयत्न करावा, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. संजय डुडूल म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सध्या होत आहे. समाजामध्ये अनेक समस्यां आहेत, त्या समस्यां दूर होण्याकरिता आणि गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी उचलली पाहिजे. एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने पुढे आले पाहिजे. राष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्ताने आमचे विद्यार्थी ही जबाबदारी उचलतील, असे आवाहन करुन राष्ट्रीय विज्ञान दिवसाच्या त्यांनी शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. संचालन डॉ. मनिषा कोडापे, तर आभार डॉ. जागृती बारब्दे यांनी मानले. राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाला विद्यापीठातील विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २८/०२/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी